**ANNEXURE- VII**

## The efforts made by Programme Officer, Volunteers and other organizations to make the NSS activities?

### A) Education Activities-

#### Participation in Literacy  Programme Performance-02

**To increase awareness about agricultural education in society the Krishi Shiksha Day, 18 hours study on ewe of Dr. Ambedkar Jayanti were organized .**

| Year | 2019-2020 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|
| No. of activities | 01 | 03 | 02 |



लोकमत समाचार

# कृषि शिक्षा दिवस मनाया, पौधारोपण किया

अंबाजोगाई । 4 दिसंबर । लोस सेवा

प्रथम राष्ट्रपति डॉ राजेंद्र प्रसाद की जयंती के उपलक्ष्य में गुरुवार को शासकीय कृषि महाविद्यालय में कृषि शिक्षा दिवस मनाया गया. इस दौरान डॉ राजेंद्र प्रसाद के चित्र का पूजन करने के बाद महाविद्यालय परिसर में पौधारोपण भी किया गया.

उक्त कार्यक्रम भारतीय कृषि संशोधन परिषद दिल्ली तथा वसंतराव नाईक मराठवाड़ा कृषि विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ अशोक ढवण एवं शिक्षा संचालक अधिष्ठाता डॉ धर्मराज गोखले के मार्गदर्शन में आयोजित किया गया था. अध्यक्षता कृषि महाविद्यालय के अधिष्ठाता डॉ बाबासाहब ठोंबरे ने की. प्रमुख अतिथि मोरेवाड़ी के पूर्व सरपंच वसंतराव मोरे, डॉ अरुण कदम, डॉ प्रताप नालवंडीकर और डॉ दीपक लोखंडे थे. डॉ ठोंबरे कहा कि किसानों को 'पेड़ लगाओ-पेड़ बढ़ाओ' तथा पानी अड़ाकर पर्यावरण संतुलन को बढ़ावा देने की सलाह डॉ राजेंद्र प्रसाद ने ही दी थी. कार्यक्रम में बड़ी संख्या में लोग थे.

Marathwada
Page No. 13 Dec 05, 2020
Powered by: erelego.com




**National Agricultural Day (4 December) -** In remembrance with Dr Rajedra Prasad



# कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय कृषी शिक्षण दिन संपन्न

## भारतरत्न डॉ.राजेंद्र प्रसादांचे कृषी धोरण सुधारणेत महत्वपूर्ण योगदान–सहयोगी अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे

अंबाजोगाई /प्रतिनिधी

कृषी महाविद्यालयात भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांचा जन्मदिन वृक्ष लागवड करून संपन्न झाला.भारतीय कृषी संशोधन परिषद,नवी दिल्लीच्या निर्देशानुसार पाचव्या कृषी शिक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे हे होते.तर सामाजिक कार्यकर्ते माजी सरपंच बसंतराव मोरे,डॉ.अरूण कदम,डॉ.प्रताप नाळ्वंडीकर, डॉ.दीपक लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ.ठोंबरे म्हणाले की,राष्ट्रीय कृषी धोरण निश्चित करण्यामध्ये भारतरत्न डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून केलेले कार्य कृषी संस्कृतीला बळकटी निर्माण करणारे होते. त्यांनी शेतकऱ्यांना झाडे लावा - झाडे जगवा,पाणी अडवा - पाणी जिरवा व याद्वारे पर्यावरण संतुलन राखले जावे असा संदेश त्यांनी राष्ट्राला दिला.डॉ.ठोंबरे पुढे असे म्हणाले की, वसुंधरा पर्यावरणपूरक करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्वाचे आहे.कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमा पूजनाने व परिसरात वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन शिवार पाहणी करून करण्यात आली.कृषी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड व संवर्धनाचा वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अशोक ढवण यांच्या संकल्पनेतून व संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.धर्मराज गोखले यांच्या मार्गदर्शनातून यशस्वीपणे अविरत राबविण्यात येत आहे. ग्रामीण कृषी कवी राजेश रेवले यांनी वृक्ष संवर्धन व पर्यावरण विषयक कृषी शिक्षण दिनानिमित्त कविता सादर केली.कृषी शिक्षणाचा । करूया जागर ।

कृषी अवतार । चला घेऊ ।
रात्रंदिन आम्हा । मातीचेच स्वप्न ।
मातीतून रत्न । काढूयात ।
गरज काळाची । शोधू वाण नवे ।
पाखरांचे थवे । टिपतील ।
चला आता सारे । होऊ कटिबद्ध ।
करूया समृद्ध । बळीराजा ।

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नरेशकुमार जायेवार यांनी तर आभार डॉ.नरेंद्र कांबळे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.सुनील गलांडे, प्रा.सुहास जाधव, डॉ.विद्या तायडे,डॉ.योगेश वाघमारे, अनंत मुंडे,व्यंकटेश मगर,मनिषा बगाडे,माया भिकाणे,पूजा वावरगिरे, यादवराव पाटील व सय्यद इरफान यांनी विशेष परिश्रम घेतले.




**Dr Barure (Speaker), Shri Zadke (Addition Collector), Dr Thombre and others**



SMART बीड | सोमवार,१ मार्च २०२१ शहर

# भाषेमुळेच मानवी जीवन उन्नत आणि विकसित झाले : प्रा.बरूरे

अंबाजोगाई / प्रतिनिधी : भाषा नसती तर मानव आणि पशु यात काहीच फरक राहिला नसता, केवळ भाषेमुळेच मानवी जीवन उन्नत आणि विकसित झालेले आहे. कालपरत्वे संतांनी भाषा विकसित आणि संस्कारित करून आपल्या प्रबोधनातून मानवी जीवनावर संस्कार केले. माणसाने जागतिक पातळीवर बहुभाषिक असणे चांगलेच परंतु आपल्या मातृभाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे असे विचार डॉ. शैलजा बरुरे यांनी व्यक्त केले.

येथील कृषि महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिनाचे' आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय, अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, उद्घाटक उपविभागीय अधिकारी शरद झाडके, प्रमुख मार्गदर्शिका स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. शैलजा बरुरे तर प्रमुख अतिथी वनामकृवि चे माजी कुलसचिव डॉ. दिगंबर चव्हाण हे उपस्थित होते. व्यासपीठावर डॉ. अरुण कदम, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळ्वंडीकर व डॉ. वसंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. भाषा नसती तर मानव आणि पशु यात काहीच फरक राहिला नसता, केवळ भाषेमुळेच मानवी जीवन उन्नत आणि विकसित झालेले आहे. कालपरत्वे संतांनी भाषा विकसित आणि संस्कारित करून आपल्या प्रबोधनातून मानवी जीवनावर संस्कार केले. माणसाने जागतिक पातळीवर बहुभाषिक असणे चांगलेच परंतु आपल्या मातृभाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे असे विचार डॉ. शैलजा बरुरे यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना व्यक्त केले. भावना किंवा अभिव्यक्ती प्रकट करण्यासाठी भाषा हेच प्रभावी माध्यम आहे. भाषेच्या प्रेमात पडलात तर जीवन सुंदर होईल. भाषा हे सगळ्यात पहिलं प्रसार माध्यम आहे. शब्द ही संपत्ती आहे, तीची जपणूक करा व ती व्यर्थ वाया घालवू नका असे मत त्यांनी पुढे बोलताना व्यक्त केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात

शरद झाडके म्हणाले की, इमोजीतूनच (खाणाखुणा) भाषेचा शोध लागला, आता आपण इमोजीकडे परत जात आहोत. भाषा विकसित करायची असेल तर परीक्षा या बहुपर्यायी पेक्षा लेखी स्वरूपात असल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांनी जीवन जाणिवा जाग्या ठेवून अभ्यास केला पाहिजे. अभावग्रस्त जीवन जाणिवा ठेवून जगणारे विद्यार्थी बहुतांशपणे यशस्वी होतात. दर्जेदार आणि सुसंस्कृत विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे असे सांगून विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुरुजनांनी शिकवलेले आत्मसात करून आचरणात आणणे हीच खरी गुरूदक्षिणा ठरते. शेतीच्या सातबारा प्रमाणेच आपल्या जीवनाचा सातबाराही सर्वांगाने चांगला असावा असे बोधप्रद विचार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ. दिगंबर चव्हाण यांनी आपल्या मनोगतात कृषिच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील बौद्धिक व प्रात्यक्षिकाबरोबर व्यवहारिक गुणवत्ता उतिर्ण असावे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रम शासकीय निर्देशानुसार नियमांचा अवलंब करुन संपन्न करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळ्वंडीकर यांनी मांडले मान्यवरांचा परिचय डॉ. नरेंद्र कांबळे व डॉ नरेश जायेवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सुहास जाधव यांनी केले तर श्रीमती माय भिकाने यांनी आभार मानले.

## Water Conservation Activities -

**Celebration of Jagtik Jal Din (22March)**

पुण्य नगरी

SMART बीड

# कृषी विकासात जलसाक्षरता महत्त्वाची : चिक्षे

## कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथे जागतिक जलदिन साजरा

**अंबाजोगाई/प्रतिनिधी:** भूगर्भातील पाण्याचा होणारा अतिरेकी उपसा आणि निर्दयीपणे केलेली वृक्षांची कत्तल यामुळे पावसावर होणारा विपरीत परिणाम आणि त्यातून उत्पन्न झालेले पाण्याचे दुर्भिक्ष, त्यामुळे मानव आज पाणीटंचाईला सामोरे जात आहे. जलसाक्षरता अतिशय महत्वाची आहे, असे प्रतिपादन जलमित्र प्रसाद चिक्षे यांनी केले. ते कृषि महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत रासेयोच्या वतीने जागतिक जलदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे हे होते तर व्यासपीठावर डॉ.अरुण कदम व जिमखाना उपाध्यक्ष डॉ.प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पाणी ही नैसर्गिक संपत्ती असून त्याचे जतन व संवर्धन आवश्यक आहे.



कृषिच्या विद्यार्थ्यांनी कृषि अक्षराबरोबरच जलसाक्षर होऊन शेतकऱ्यांचे अन्नधान्य उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सहकार्य करावे. प्रक्षेत्रावर समतल चर विकसित करून जागेवर पाणी अडवून पूर्णतः जिरवावे. पाणी आणि वाणी समतोल वापरून वर्तमाना बरोबरच भविष्यकाळ ही सुनिश्चित करावा, असे आवाहन प्राचार्य बाबासाहेब ठोंबरे यांनी अध्यक्षीय समारोपात आपले विचार मांडले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ.प्रताप नाळवंडीकर तर सूत्रसंचालन डॉ.दिपक लोखंडे यांनी आभार प्रा.संजय राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.बसवलिंगाप्पा कलालबंडी, डॉ. सुहास जाधव, प्रा.सुनील गलांडे, डॉ. नरेंद्र कांबळे, डॉ.नरेशकुमार जायेवार, डॉ. योगेश वाघमारे, माया भिकाणे, अनंत मुंढे, सुनील गिरी, यादव पाटील, सय्यद इरफान, स्वप्निल शिल्लार, पुजा वावरगीरे, राजेश रेवले, प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले.

आदर्श गावकरी

# कृषी विकासात जलसाक्षरता महत्त्वाची:डॉ.ठोंबरे

## कृषी महाविद्यालयात जागतिक जल दिन साजरा

**अंबाजोगाई / प्रतिनिधी**

भूगर्भातील पाण्याचा होणारा अतिरेकी उपसा आणि निर्दयीपणे केलेली वृक्षांची कत्तल यामुळे पावसावर होणारा विपरीत परिणाम आणि त्यातून उत्पन्न झालेले पाण्याचे दुर्भिक्ष, त्यामुळे मानव आज पाणीटंचाईला सामोरे जात आहे. हे आपणच अविवेकीपणाने ओढवून घेतलेले संकट आहे. निसर्ग मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहे. परंतु माणसाची हाव तो पूर्ण करू शकत नाही, असे प्रतिपादन जलमित्र प्रसाद चिक्षे यांनी केले आहे. ते कृषी महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत रासेयोच्या वतीने जागतिक जलदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालय, अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे होते तर व्यासपीठावर डॉ. अरुण कदम व जिमखाना उपाध्यक्ष डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात, डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, पाणी ही नैसर्गिक संपत्ती असून त्याचे जतन व संवर्धन आवश्यक आहे. कृषीच्या



विद्यार्थ्यांनी कृषी अक्षराबरोबरच जलसाक्षर होऊन शेतकऱ्यांचे अन्नधान्य उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सहकार्य करावे. प्रक्षेत्रावर समतल चर विकसित करून जागेवर पाणी अडवून पूर्णतः जिरवावे. पाणी आणि वाणी समतोल वापरून वर्तमानाबरोबरच भविष्यकाळ ही सुनिश्चित करा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ.प्रताप नाळवंडीकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दिपक लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. संजय राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बसवलिंगाप्पा कलालबंडी, डॉ. सुहास जाधव, प्रा. सुनील गलांडे, डॉ. नरेंद्र कांबळे, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. योगेश वाघमारे, माया भिकाणे, अनंत मुंढे, सुनील गिरी, यादव पाटील, सय्यद इरफान, स्वप्निल शिल्लार, पुजा वावरगीरे, राजेश रेवले, प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले.

Auranagabad Edition

## C) Participation in Cleanliness Activities-75

**Cleanness Awareness programme – various cleanliness programmes were arranged on college campus , Ambajogai city public places and also in adopted village Morewadi to give the message of Swach Bharat Mission.**

| Year | 2019-2020 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|
| No. of activities | 10 | 15 | 50 |



कृषी,राजकारण व सामाजिक घडामोडीचा वेध घेणारे स्वतंत्र विचाराचे वृत्तपत्र

R.N.I. No. /MAHMAR /231559 /2002

# कृषी सोबती

|बीड| दि.१५ऑक्टोबर२०२१

**कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे स्वच्छ भारत अभियानचे बारावे पुष्प**

**स्वच्छ भारत अभियानात सहभाग म्हणजे देशसेवेची संधी – शांतीदूत अविनाश मोरे**

अबाजोगाई | प्रतिनिधी
दि. १२ ऑक्टोबर
भारत सरकारद्वारे राबविण्यात येत असलेले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी प्रशासनाच्या निर्देशानुसार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, मार्गदर्शक शांतीदूत श्री अविनाश मोरे, प्रमुख अतिथी श्री प्रदिप पुजदेकर तर व्यासपीठावर डॉ. प्रताप नाळवंडीकर, डॉ. रवींद्र चव्हाण, डॉ. बसवलिंगप्पा कलालबंडी यांची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब ठोंबरे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, 'स्वच्छ भारत अभियानाचा' उद्देश केवळ आपल्या सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करणे एवढेच मर्यादित नाही तर नागरिकांच्या सहभागातून जास्तीत जास्त वृक्ष लागवड करुन कचरामुक्त व प्रदूषणमुक्त वातावरण बनविणे आहे. तसेच देशात पर्यटनास चालना देण्याच्या दृष्टीने स्वच्छ भारताची निर्मिती आवश्यक व महत्त्वपूर्ण आहे तसेच डॉ. ठोंबरे पुढे बोलताना असेही म्हणाले की, देशाची प्रतिमा आणखी उंचावण्यासाठी या अभियानाकडे प्रत्येकाने संधी म्हणून पाहिले पाहिजे.
आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शांतीदूत श्री अविनाश मोरे म्हणाले की, कोरोनासारख्या साथ रोगाच्या काळात स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची आहे. संत गाडगेबाबाची शिकवण आजही महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छतेचा वसा घेऊन जगले पाहिजे. स्वच्छ भारत अभियानात सहभाग म्हणजे देशसेवेची संधी असे आपण समजले पाहिजे.
प्रमुख अथिती श्री प्रदीप पुजदेकर आपल्या मनोगतात म्हणाले की, आपल्याला गांधीजीच्या विचारधारेतून व त्यांच्या नजरेतून भारताकडे पहावे लागेल. त्यासाठी आपण सामाजिक जाणीव जोपासायला हवी. त्या दृष्टीने स्वतःसाठी, गावासाठी व देशासाठी सकारात्मक कार्य करण्याची तळमळ असायला हवी. पुढे बोलताना ते म्हणाले की, मानवी जीवनात पैसा हा सर्वस्वी नाही तर आरोग्यदायी आयुष्यही महत्त्वाचे आहे. त्यासाठी खेळ व व्यायाम आवश्यक आहे. भारत देश महासत्ता व्हावा यासाठी कृषि क्षेत्राचा वाटा वाढवण्यासाठी कृतिशील असले पाहिजे.
कार्यक्रमात विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सुमित शेळके व ऋतुजा जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. बसलींगप्पा कलालबंडी यांनी मांडले, सुत्रसंचालन श्रीमती पुजा वावरगीरे यांनी केले तर आभार श्री भास्कर देशपांडे यांनी मानले.
कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. मोहन धुप्पे, डॉ. सुहास जाधव, प्रा. सुनिल गलांडे, डॉ. संजय राठोड, डॉ. नरेशकुमार जायेवार, डॉ. योगेश वाघमारे, डॉ.अजित पुरी, प्रमोद कळसकर, श्री अनंत मुंडे, श्री यादव पाटील, श्री बालासाहेब चिल्लरगे, श्री अनिल खेडेकर, श्री स्वप्निल शिल्लार, श्री राजेश रेवले, श्री प्रकाश मुजमुले, नंदकिशोर मोरे आदींनी परिश्रम घेतले.

# पर्यावरण संवर्धनासोबतच आरोग्य जोपासण्याचे कार्य कृषि महाविद्यालयातून होतेय : अधिष्ठाता डॉ.भास्करराव खैरे

## कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे स्वच्छ भारत अभियानाचे अठ्ठाविसावे पुष्प

अंबाजोगाई (प्रतिनिधी)– भारत सरकार द्वारे राबवण्यात येत असलेले वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी प्रशासनाच्या निर्देशानुसार,कृषि महाविद्यालय आंबेजोगाई अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात येत आहे.या अभियानाचे दिनांक २८ ऑक्टोबर रोजी अठ्ठाविसावे पुष्प गुंफण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे,मार्गदर्शक स्वराती ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता

पान ३ वर

दिव्य लोकप्रभा
Sat 30-10-2021
Page No. 5

# स्वच्छ भारत अभियानातून श्रमसंस्कार रुजतात गटशिक्षणाधिकारी चंदन कुलकर्णी यांचे मत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माणूस सर्वसामान्य असो की असामान्य, प्रत्येकालाच आपापल्या क्षमतेनुसार श्रम करता येतात. श्रम हे मानवी जीवनातील एक श्रेष्ठ मूल्य आहे. त्यावरच आपल्या आयुष्याची इमारत उभी होत असते. अशा स्वच्छ भारत अभियान अभियानातून आपल्या अंगी श्रमसंस्कार रुजत असतात असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी चंदन कुलकर्णी यांनी केले.भारत सरकार द्वारे राबविण्यात येत असलेले स्वच्छ भारत अभियान हे एक देशव्यापी अभियान आहे या अभियानाअंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी प्रशासनाच्या निर्देशानुसार, कृषि महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण हे अभियान राबविण्यात येत आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंदन कुलकर्णी बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख अतिथी म्हणून




आंबेजोगाई येथील माजी उपनगराध्यक्ष श्री सतीश लोमटे, शिवाजी खोगरे, वृक्षमित्र राजेसाहेब किर्दंत यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या मनोगतात सतीश लोमटे म्हणाले की ,पर्यावरणाचा होणारा –हास लक्षात घेऊन निसर्गसंवर्धन, वृक्षलागवड व संगोपनाचे कार्य राष्ट्रीय पातळीवर होत आहे. या कार्यात अंबाजोगाई येथील कृषि महाविद्यालय मोलाची भर घालत आहे. त्यातूनच या कृषि महाविद्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड व संवर्धनातून ऑक्सीजन पार्क निर्मिती होत आहे.शिवाजी खोगरे आपल्या भाषणात म्हणाले की, स्वच्छता ही आरोग्याच्या दृष्टीने आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. बाह्य स्वच्छतेबरोबरच आपल्या मनाची अंतर्गत स्वच्छताही अत्यंत महत्वाची असते. अशा अंतर्बाह्य स्वच्छतेतून युवक–युवती मध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत होत असतो. वृक्षमित्र राजेसाहेब कीर्दंत यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानातून व्यक्तिगत स्वच्छतेबरोबरच आपला देश स्वच्छ होत आहे. आणि यातूनच आपल्या देशाची प्रतिमा उजळून निघण्यास मदत होईल. जिथे स्वच्छता व सुंदरता असते तिथे ईश्वराचा वास असतो. या अभियानाद्वारे कृषि महाविद्यालयाचा परिसर सुंदर आणि स्वच्छ झाला आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र चव्हाण यांनी मांडले, सुत्रसंचालन डॉ. अजित पुरी यांनी केले तर आभार प्रमोद कळसकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बसलिंगाप्पा कलालबंडी, डॉ.मोहन धुप्पे, डॉ. सुहास जाधव, प्रा. संजय राठोड, डॉ. योगेश वाघमारे, प्रमोद कळसकर, श्रीमती माया भिकाने, अनंत मुंडे, अनिल खेडेकर, यादव पाटील, स्वप्नील शिल्लार, भास्कर देशपांडे, श्रीमती पूजा वावरगीरे, नंदकिशोर मोरे, प्रकाश मुजमुले यांनी परिश्रम घेतले.

## Photographic glimpses of cleanliness campaign carried out in college campus and adopted villege, Ambajogai public places







**Participation Cleaning campaign in Morewadi**




**Participation Nala cleaning done in Special Camp at Village Morewadi**




**Participation in Ambajogai cleaning campaign**




**Participation in Parthenium Eradication Programme**




**Cleaning of Morewadi village temple**

## D)Rural Development

**College of Agriculture, Ambajogai NSS volunteers of VII sem from groups of 20 students each under RAWE went to different allotted villages and also stayed in college demonstrated Good Agricultural Practices (GAP aand GHP) viz. Protected cultivation, mulching seed treatments, efficient marketing etc . Where they suggested improved and alternate cropping pland which were profitable than existing systems.**

| Year | 2019-2020<br>No. of activities | 2020-21<br>No. of activities | 2021-22<br>No. of activities |
|---|---|---|---|
| Rural Agricultural Work Experience (RAWE) | 20 Weeks | 20 Weeks<br>Offline | 20 Weeks<br>Offline |

पुढारी



अंबाजोगाई : रासेयो शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी गाव परिसरात स्वच्छता अभियान राबवले.

### रासेयो शिबिरातून ग्रामीण संस्कृतीची ओळख : ठोंबरे

अंबाजोगाई, पुढारी वृत्तसेवा : विद्यार्थी हे आपल्या कुटुंबाचे, समाजाचे किंबहुना देशाचे भविष्य असतात. विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे मिळावेत, आपल्या देशाप्रती जाज्वल्य राष्ट्रप्रेम वृद्धिंगत व्हावे, निरीक्षणातून ग्रामसंस्कृती जवळून अनुभवता यावी. हा उद्देश राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे आयोजन करण्यामागे असतो. विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवायलाच हवा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी केले.

कृषी महाविद्यालयांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मौजे मोरेवाडी येथे विशेष शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.ठोंबरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबा सह. साखर कारखान्याचे उपाध्यक्ष हनुमंतराव मोरे हे होते. शामसुंदर मोरे, सरपंच ज्ञानेश्वरी कचरे, उपसरपंच रेखा मोरे, ज्ञानेश्वर मोरे, सोपानराव मोरे, ॲड. व्यंकटराव मोरे, ग्रामविकास अधिकारी पोटभरे, सविता सोमवंशी, डॉ. अरुण कदम, डॉ. प्रताप नाळवंडीकर यांची विशेष उपस्थिती होती.

My Beed Edition
Mar 27, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## COLLEGE OF AGRICULTURE, AMBAJOGAI

NO.CAA/ 629 /2020 Date: 26.06.2020

### OFFICE ORDER

The undersigned is pleased to appoint following committee for smooth conduct of Rural Agriculture Work Experience and Student Ready Programme 2020-21.

| Sr.No. | Name of the officer/Employee | Designation | Responsibility |
|---|---|---|---|
| 1 | Dr.B.M.Kalalbandi | Associate Professor | Chairman |
| 2 | Dr.N.E.Jayewar | Assistant Professor | Member |
| 3 | Dr.N.S.Kamble | Assistant Professor | Member |
| 4 | Dr.V.V.Tayde | Assistant Professor | Co-cordinator & Member Secretary |

26.06.2020

Associate Dean and Principal
College of Agriculture, Ambajogai

Associate Dean & Principal
College of Agricultur, Ambajogai

**Copy Submitted to:** The Director of Instruction and Dean, F/A , VNMKV , Parbhani for favour of information please .

**Copy for necessary action to:**

1. Dr.B.M.Kalalbandi, Associate Professor, College of Agriculture, Ambajogai.
2. Dr. N. E.Jayewar, Assistant Professor, College of Agriculture, Ambajogai.
3. Dr. N. S. Kamble , Assistant Professor, College of Agriculture, Ambajogai.
4. Dr. V. V. Tayde , Assistant Professor, College of Agriculture, Ambajogai.

CS Scanned with CamScanner

**College order for RAWE**